# प्रातःकाल

मुंबई, मंगळवार दि. ०९ एप्रिल २०१९




'जग जोडा, शांतता अनुभवा, जीवन साजरे करा' असा संदेश देत मुंबईतील दोन व्यावसायिक प्रवीण मेहता आणि डॉक्टर सुधीर बलदोटा या मुंबईस्थित दोन रोटेरियन्सनी ८ एप्रिल रोजी मुंबई येथून जगप्रवासाला सुरुवात केली असून ते आशिया, युरोप, दक्षिण अमेरिका आणि उत्तर अमेरिका या ४ उपखंडांतून तसेच ६० देशांमधून प्रवास करत ३०० दिवसांमध्ये ७०००० किलोमीटर पूर्ण करणार आहेत. या प्रवासादरम्यान हे दोघे विविध देशांमधील शास्त्रज्ञ, संशोधक, कलाकार, सामाजिक व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, रेडिओ जॉकी, लेखक, शिक्षक किंवा समाजामध्ये प्रगती घडवून आणणारी व्यक्ती अश्या १२० मान्यवरांना भेटणार आहेत. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्टने या उपक्रमाला पाठबळ दिले असून ही एक 'परिवर्तनाच्या मार्गावरील यशोगाथा' आहे असे त्याचे वर्णन केले आहे.